**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०२/ २०१६.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १६ / ०७ /२०१६.

अहमदनगर महानगरपालिकेच्या विशेष सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (ड) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०२, बुधवार दिनांक - २० / ०७ /२०१६.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( ड) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा **बुधवार दिनांक - २०/०७/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिका सभागृहात** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक-२ बुधवार दिनांक - २० / ०७ / २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिका सभागृहात** होणा-या विशेष सभेची विषय पत्रिका.

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| ०७ | मा.स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या आठ सदस्यांच्या जागी नवीन सदस्यांची नेमणूक करणेबाबत. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : ०८ / ०३ /२०१.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ०७** **दिनांक : २० / ०७ /२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या आठ सदस्यांच्या जागी नवीन सदस्यांची नेमणूक करणेबाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंतीपुर्वक रिपोर्ट फेरसादर करण्यांत येतो की, दिनांक ०१/०२/२०१६ रोजी निवृत्त होत असलेल्या मा.स्थायी समितीच्या आठ सदस्यांचे जागेवर सदस्य नियुक्त करणेकरीता दिनांक २५/०१/२०१६ रोजी ऑफिस रिपोर्ट सादर केला होता. त्या रिपोर्टवर, "सादर केलेला प्रस्ताव ६७ इतक्या सदस्य संख्येवर सदस्य मुल्य निश्चित करुन तयार केला आहे. सद्यस्थितीमध्ये ६८ सदस्य आहेत त्यामुळे ६८ सदस्य संख्येनुसार सदस्य मुल्य निश्चित करुन प्रस्ताव फेर सादर करा." असा आदेश मा.महापौर, अहमदनगर महानगरपालिका यांनी दिनांक ०८/०७/२०१६ रोजी दिला आहे. अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या आजमितीस असलेल्या १६ सदस्यांपैकी आठ सदस्य दिनांक १/२/२०१६ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २० (३) नुसार निवृत्त होत आहेत. त्यांचे जागी नवीन सदस्य नेमणूक करावयाचे आहेत. यासंबंधी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये पुढील प्रमाणे तरतूदी आहेत.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २० स्थायी समितीची रचना :-**

**(१) स्थायी समितीत १६ (सोळा) पालिका सदस्य असतील.**

**(२) महानगरपालिकेने सार्वत्रीक निवडणुकांनंतर आपल्या पहिल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी सोळा व्यक्तिंची स्थायी समितीचे सदस्य म्हणून नेमणूक केली पाहिजे.**

**(३) स्थायी समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट कलम (२) मध्ये उल्लेख केलेली महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील.**

**परंतू सार्वत्रीक निवडणूका घेण्यात येतील तेव्हा,स्थायी समितीचे जे सदस्य पदावर असतील ते सर्व पोट-कलम (२) अन्वये नवीन समितीची निवडणूक झाल्यावर आपल्या पदावरून निवृत्त होतील.**

**(४) पोट- कलम (२) अन्वये निवडून आल्यानंतर एक वर्षाने पोटकलम (३) मध्ये विर्निदिष्ट केलेल्या त्यांच्या निवृत्तीच्या तारखेपुर्वी स्थायी समितीचा सभापती ठरविल अशा वेळी व अशा रीतीने चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल आणि त्यानंतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळपर्यंत असतील ते निवृत्त होतील.**

**परंतू पुन्हा नेमण्यात आलेल्या सदस्याच्या बाबतीत,या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी त्याच्या पदाची मुदत त्याच्या फेरनेमणुकीच्या तारखेपासून मोजण्यात येईल.**

**(५) महानगरपालिकेने पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यातील आपल्या पहिल्या सभेत उक्त तारखेस जे सदस्य निवृत्त होणार असतील त्या सदस्यांच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीच्या नवीन सदस्यांची नेमणूक केली पाहिजे.**

(६) जो कोणताही पालिका सदस्य स्थायी समितीचा सदस्य म्हणून असण्याचे बंद होईल तो पुन्हा - नेमला जाण्यास पात्र असेल.

तसेच या रिक्त पदांवर सदस्य नेमणुकीकरीताची पध्दती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३१ -अ मध्ये पुढील प्रमाणे नमुद केली आहे.

३१-अ. प्रमाणशीर प्रतिनिधित्व देउन समित्यांवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे :- कोणत्याही समितीवरील पालिका सदस्याची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाव्दारे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात अथवा तदन्वये केलेल्या नियमात किंवा उपविधींमध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, महानगरपालिकेव्दारे यासमित्यांवर केली जाणारी पालिका सदस्यांची नियुक्ती ही, पोट-कलम (२) च्या तरतुदींनुसार पालिका सदस्यांचे नाम निर्देशन करून करण्यात येईल- मग ही नियुक्ती नियमित पदावरील असो किंवा नैमित्तीक रिक्त पदावरील असो -

(अ) स्थायी समिती,

(ब) परिवहन समिती,

(क) कलम ३० अन्वये नियुक्त केलेली कोणतीही विशेष समिती,

(ड) कलम ३१ अन्वये नियुक्त केलेली कोणतीही तद्‌र्थ समिती,

(२) समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचारविनिमय करुन शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील :

परंतु, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांचे तौलनिक संख्याबळ हे, प्रथमतः पालक सदस्यांच्या एकूण संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तद्‌नंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांच्या पालिका सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल, अशा प्रकारे आलेली संख्या ही त्या-त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल. अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेऊन, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला जागा वाटून देण्यात येतील. अशा रीतीने जागा वाटून दिल्यानंतर, एक किंवा अधिक जागा वाटून द्यावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वात मोठया अपूर्णांक संख्येपासून सुरुवात करुन तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला प्रत्येकी एक याप्रमाणे वाटून देण्यात येतील :

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य आर्हता अधिनियम १९८६ (१९८७ चा महा.२०) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरीता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र येऊन आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर, अशा

**आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काहीही आघाडी किंवा फ्रंट निवडणुकीपूर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील.**

**(३) अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल.**

वरील क.२० (२) मध्ये नमुद केल्याप्रमाणे १६ सदस्य निवडीसाठी दिनांक १५/२/२०१४ रोजी सभा झाली होती. त्यामुळे मागील वर्षी ०१/०२/२०१५पासून त्यापैकी ८ सदस्य चिठ्ठया टाकून निवृत्त करण्यात आले. तद्‌नंतर महासभा क्र. ६ दिनांक १२/०२/२०१५ मध्ये नवीन ८ सदस्य नेमण्यात आलेले आहेत. त्यानुसार १६ सदस्य स्थायी समितीमध्ये होते ते पुढील प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| १ | मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले | सभापती स्थायी समिती |
| २ | मा.श्री.संपत विजय बारस्कर | सदस्य, स्थायी समिती |
| ३ | मा.श्रीमती.मंगल सतिष गुंदेचा | सदस्य, स्थायी समिती |
| ४ | मा.श्री.कुमार बबनराव वाकळे | सदस्य, स्थायी समिती |
| ५ | मा.सौ.सुनिता महेंद्र कांबळे | सदस्य, स्थायी समिती |
| ६ | मा.श्री.सचिन तुकाराम जाधव | सदस्य, स्थायी समिती |
| ७ | मा.सौ.उषा शरद ठाणगे | सदस्य, स्थायी समिती |
| ८ | मा.श्री.दीप नारायण चव्हाण | सदस्य, स्थायी समिती |
| ९ | मा.श्री.अनिल वसंतराव बोरूडे | सदस्य, स्थायी समिती |
| १० | मा.सौ.छाया सुरेश तिवारी | सदस्य, स्थायी समिती |
| ११ | मा.सौ.विद्या दिपक खैरे | सदस्य, स्थायी समिती |
| १२ | मा.श्री.श्रीपाद शंकर छिंदम | सदस्य, स्थायी समिती |
| १३ | मा.सौ.उषा शिवाजीराव नलवडे | सदस्य, स्थायी समिती |
| १४ | मा.सौ.रूपाली निखील वारे | सदस्य, स्थायी समिती |
| १५ | मा.श्री.समद वहाब खान | सदस्य, स्थायी समिती |
| १६ | रिक्त | सदस्य, स्थायी समिती |

यापैकी पुढील ७ सदस्य हे दिनांक ०१/०२/२०१६ रोजी दुपारी कलम.२०(४) मधील तरतुदी प्रमाणे निवृत्त झाले आहेत. तसेच एक जागा रिक्त आहे. ती अद्याप पावेतो भरण्यात आलेली नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मा.श्री.संपत विजय बारस्कर | सदस्य | शहर विकास आघाडी |
| २ | मा.श्रीमती.मंगल सतिष गुंदेचा | सदस्य | शहर विकास आघाडी |
| ३ | मा.श्री.कुमार बबनराव वाकळे | सदस्य | शहर विकास आघाडी |
| ४ | मा.सौ.सुनिता महेंद्र कांबळे | सदस्य | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसआघाडी |
| ५ | मा.श्री.सचिन तुकाराम जाधव | सदस्य | अहमदनगर महानगरपालिका शिवसेना व अपक्ष विकासआघाडी |
| ६ | मा.सौ.उषा शरद ठाणगे | सदस्य | महासभेतून नियुक्त |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | मा.श्री.दीप नारायण चव्हाण | सदस्य | महासभेतून नियुक्त |
| ८ | रिक्त | सदस्य | शहर विकास आघाडी |

या निवृत्त झालेल्या सदस्यांच्या जागी नेमणुक करणे कामी कलम २० (५) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेने पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यातील आपल्या पहिल्या सभेत उक्त तारखेस जे सदस्य निवृत्त होणार आहेत त्या सदस्यांच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीच्या नवीन सदस्यांची नेमणूक केली पाहिजे.

तथापी वर उल्लेख केलेले निवृत्त होणारे सदस्य क.२० (६) नुसार पुन्हा नेमले जाण्यास पात्र असतील.

सदरची नेमणुक कलम ३१-अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे पक्षीय बलाबलाप्रमाणे प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन करावयाची आहे.

मा.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय यांचे पत्र क्रमांक संकिर्ण २००८ /१/प्र.क्र.१/ २००८ नवि-३२ दिनांक १० जानेवारी २००८ चे मा.नगरसचिव, पुणे महानगरपालिका पुणे यांना पाठविलेल्या पत्रामध्ये पक्षीय बलाबलाप्रमाणे प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देण्याबाबत खालील प्रमाणे नमूद केलेले आहे.-

**' महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यांत येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणुन समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याबाबत तरतूद अधिनियमात सुधारणे व्दारे करण्यांत आल्यानुसार मा.स्थायी समितीच्या सदस्यांची नेमणुक बलाबलानुसार करण्यांत आली आहे. सदरहू बलाबल कायम असल्यास जे निम्मे सदस्य निवृत्त होत आहेत ते ज्या मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे असतील त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे अथवा फ्रंटचे नविन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे. जेणे करुन बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्या बाबतच्या तरतूदीची पुर्तता होऊ शकेल.**

**तसेच कोणत्याही समितीच्या कोणत्याही कारणामुळे रिक्त होणा-या जागांवर निवृत्त झालेला सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा, आघाडीचा किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या, नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या, आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षीत आहे. मात्र अशा वेळेस पुर्वीच्या तुलनेने पक्षाच्या / गटाच्या तौलनिक संख्येत बदल झालेला नसावा.'**

मागील वर्षी चिठ्ठया काढून निवृत्त करण्यात आलेल्या सदस्यांच्या जागी दिनांक १२/२/२०१५ रोजी नविन ८ सदस्य नेमले त्यावेळी तौलानीक संख्याबळ पुढील प्रमाणे होते. त्यावेळी नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडीच्या सौ.विजया दिघे यांच्या निधनामुळे महानगरपालिकेच्या ६८ सदस्यांपैकी एक जागा रिक्त होती. त्यामुळे ६७ सदस्य संख्येवर प्रतिसदस्य मुल्य काढण्यांत आले.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **एकुण सदस्य संख्या** | **÷** | **नियुक्त सदस्य संख्या** | **=** | **प्रती सदस्य मुल्य.** |
| **६७** | **÷** | **१६** | **=** | **४.१८** |

| अ. नं. | पक्ष | संख्या बळ | सदस्य मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या प्रथम स्तर | नियुक्त सदस्य संख्या व्दितीय स्तर | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी | २१ ÷ | ४.१८ | ५.०२ | ५ | -- | ५ |
| २ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष यांची भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आघाडी | ११ ÷ | ४.१८ | २.६३ | २ | -- | २ |
| ३ | शिवसेना व अपक्ष यांची शिवसेना व अपक्ष विकास आघाडी | १८ ÷ | ४.१८ | ४.३० | ४ | -- | ४ |
| ४ | भारतीय जनता पार्टी | ९ ÷ | ४.१८ | २.१५ | २ | -- | २ |
| ५ | महाराष्ट्र नवनिर्माण से-ना | ४ ÷ | ४.१८ | ०.९५ | -- | १ | १ |
| ६ | अपक्ष | १ ÷ | ४.१८ | ०.२३ | -- | -- | -- |
| ७ | अपक्ष | १ ÷ | ४.१८ | ०.२३ | -- | -- | -- |
| ८ | अपक्ष | १ ÷ | ४.१८ | ०.२३ | -- | -- | -- |
| ९ | अपक्ष | १ ÷ | ४.१८ | ०.२३ | -- | -- | -- |
| | मा.महासभेमध्ये निवड | | | | | | २ |
| | **एकुण** | | | | **१३** | **१** | **१६** |

वरील दिनांक १० जानेवारी २००८ च्या पत्राचा विचार करता अहमदनगर महानगरपालिकेच्या दिनांक १०/१/२०१६ रोजी झालेल्या पोटनिवडणुकींच्या निकालामुळे पक्षांच्या तौलनिक संख्येत बदल झालेला आहे. या पोटनिवडणुकीत निवडुन आलेल्या सदस्यांचे नावाचे राजपत्र दिनांक १८/०१/२०१६ रोजी नगरसचिव विभागास प्राप्त झाले आहे. तसेच प्रभाग क्रमांक ३ अ मधील श्री.विजय भांगरे या शिवसेना व अपक्ष विकास आघाडीच्या सदस्याचे निधन झाल्याने सदस्य संख्या ६८ ऐवजी ६७ झाली होती. या कारणांमुळे पक्षाच्या / गटाच्या

तौलनिक संख्या पुन्हा गणना करावी लागली. दिनांक २५/०१/२०१६ रोजी सादर केलेल्या रिपोर्टवर तौलनिक संख्या गणना करणेकामी मा.उपायुक्त (सा) यांचेशी दिनांक २८/०१/२०१६ रोजी समक्ष चर्चा करुन मार्गदर्शन घेतले आहे. तसेच पुणे महानगरपालिकेचे नगरसचिव मा.श्री.पारखी साहेब यांचेशी मा.उपायुक्त (सा) यांनी चर्चा केली आहे.

सदरची तौलनिक संख्या पुढील प्रमाणे होती.-

अ) एकुण सदस्य संख्या - ६७

ब) नियुक्त करावयाची सदस्य संख्या - १६

**क) एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६७ ÷ १६ = ४.१८**

प्रभाग क्र.३ अ रिक्त असल्याने विद्यमान सदस्य संख्येवर प्रती सदस्य मुल्य निश्चीत करण्यात आले आहे.

| अ. नं. | पक्ष | संख्या बळ | सदस्य मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या | | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रथम स्तर | व्दितीय स्तर | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी | २१ ÷ | ४.१८ | ५.०२ | ५ | -- | ५ |
| २ | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्ष यांची भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस आघाडी | ११ ÷ | ४.१८ | २.६३ | २ | -- | २ |
| ३ | शिवसेना व अपक्ष यांची शिवसेना व अपक्ष विकास आघाडी | १८ ÷ | ४.१८ | ४.३० | ४ | -- | ४ |
| ४ | भारतीय जनता पक्ष | ९ ÷ | ४.१८ | २.१५ | २ | -- | २ |
| ५ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ४ ÷ | ४.१८ | ०.९५ | -- | १ | १ |
| ६ | अपक्ष | १ ÷ | ४.१८ | ०.२३ | -- | -- | -- |
| ७ | अपक्ष | १ ÷ | ४.१८ | ०.२३ | -- | -- | -- |
| ८ | अपक्ष | १ ÷ | ४.१८ | ०.२३ | -- | -- | -- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | अपक्ष | १ ÷ ४.१८ | ०.२३ | -- | -- | -- |
| | महासभेमध्ये निवड | | -- | -- | -- | २ |
| | एकुण | | | १३ | १ | १६ |

तथापि मा.विजय भांगरे नगरसेवक यांच्या रिक्त जागेवर झालेल्या पोटनिवडणुकीमध्ये शिवसेना या पक्षाच्या श्रीमती.प्रतिभा विजय भांगरे या विजयी झाल्या आहेत. त्यामुळे महानगरपालिकेची निर्वाचित सदस्यांची संख्या ६८ इतकी झाली आहे.

या पोटनिवडणुकीच्या निकालाचा विचार करता मा.महापौर यांची दिनांक ०८/०७/२०१६ रोजी आदेशीत केल्याप्रमाणे ६८ इतक्या सदस्य संख्येनुसार सदस्यमुल्य काढणे आवश्यक आहे. ते पुढील प्रमाणे आहे.

अ) एकुण सदस्य संख्या - ६८

ब) नियुक्त करावयाची सदस्य संख्या - १६

**क) एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६८ ÷ १६ = ४.२५**

| अ. नं. | पक्ष | संख्या बळ सदस्य मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या | | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रथम स्तर | व्दितीय स्तर | |
| **१** | **२** | **३ ४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष -नगरसेवक यांची शहर विकास आघाडी | २१ ÷ ४.२५ | ४.९४ | ४ | -- | ४ |
| २ | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्ष यांची भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस आघाडी | ११ ÷ ४.२५ | २.५८ | २ | -- | २ |
| ३ | शिवसेना व अपक्ष यांची शिवसेना व अपक्षविकासआघाडी | १९ ÷ ४.२५ | ४.४७ | ४ | -- | ४ |
| ४ | भारतीय जनता पक्ष | ९ ÷ ४.२५ | २.११ | २ | -- | २ |
| ५ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ४ ÷ ४.२५ | ०.९४ | -- | १ | १ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | अपक्ष | १ ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ७ | अपक्ष | १ ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ८ | अपक्ष | १ ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ९ | अपक्ष | १ ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| | महासभेमध्ये निवड | | -- | -- | -- | ३ |
| | **एकुण** | | | **१२** | **१** | **१६** |

उपरोक्त पक्षनिहाय संख्या बलाबाबत अवलोकन करता निदर्शनास येते की, अ.नं.१ ते ५ मध्ये दर्शविण्यांत आलेल्या पक्षांचे एकुण १३ सदस्य नामनिर्देशनाव्दारे नेमणुकी करीता बलाबलानुसार नेमता येतात.

त्यामुळे दिनांक ०१/०२/२०१६ रोजी निवृत्त झालेल्या सदस्यांच्या जागी वरिल बलाबलाप्रमाणे पक्षाचे / गटाचे सदस्य नियुक्त करणे उचित होईल. तसेच जे ७ सदस्य निवृत्त होत आहेत व एक सदस्याची जागा रिक्त आहे. अशा ८ सदस्यांपैकी महासभेच्या निर्णयाव्दारे ३ (तीन) सदस्य नियुक्त करणे योग्य होईल असे या कार्यालयाचे मत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ (३) चे अवलोकन करता " अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामार्दिेशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल. " असे निदर्शनास येते.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी आणि मा.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय यांचे पत्र क्रमांक संकिर्ण २००८ /१/प्र.क्र.१/२००८ नवि-३२ दिनांक १० जानेवारी २००८ मधील मार्गदर्शनानुसार पुढील प्रमाणे पक्षीय बलाबलानुसार नविन ८ सदस्यांची नेमणुक करावी लागेल.

| अ.क्र. | पक्ष /आघाडी | निर्धारीत सदस्य संख्या | सध्या कार्यरत सदस्यांची संख्या | नियुक्त करावयाची सदस्य संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष - नगरसेवक यांची शहर विकास आघाडी | ४ | १ | ३ |
| २ | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्ष यांची भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस आघाडी | २ | १ | १ |
| ३ | शिवसेना व अपक्ष यांची शिवसेना व अपक्ष विकास आघाडी | ४ | ३ | १ |
| ४ | मा.महासभेच्या निर्णयानुसार | ३ | -- | ३ |

तरी मा.स्थायी समितीचे दिनांक ०१/०२/२०१६ रोजी दुपारनंतर निवृत्त झालेल्या, या अहवालामध्ये नमुद केलेल्या आठ सदस्यांचे जागी वर नमूद केलेल्या बलाबलानुसार मान्यता प्राप्त पक्षाचे , नोंदणीकृत

पक्षाचे, गटाचे, आघाडीचे अथवा फ्रंटचे नविना सदस्य नामर्दिेशनाव्दारे स्थायी समितीवर नियमानुसार नेमणेकामी प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयार्थ सादर करण्याच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, उपरोक्त प्रस्तावित केल्यानुसार मा.स्थायी समिती सभेच्या रिक्त जागा ८ भरणेकामी, ५ जागा पक्षीय बलानुसार व ३ जागा महासभेच्या निर्णयाद्वारा नियुक्ती बाबत महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ३१ (अ) २ व ३ नुसार उचित कार्यवाहीस्तव प्रस्ताव मा.महासभेपुढे पाठविणेस स.सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त श्री.विलास वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या दिनांक ११-७-२०१६ च्या फेर सादर अहवालाप्रमाणे प्रस्ताव मा.महासभेकडे सादर करणेकामी मान्यतेस्तव.

यावर मा.प्र.आयुक्त श्री.अनिल कवडे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर सौ.सुरेखाताई कदम साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

---*---

**चर्चा :-**

मा.श्रीमती.नसीम शेख :- कर्जत मधील कोपर्डी येथील जी घटना घडली त्याबद्दल मला श्रध्दांजली वाहायची व दोन शब्द बोलायचे. श्रंध्दांजलीपर भाषण केले.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- एक आठवडयापुर्वी देशाला हादरुन टाकणारी घटना घडली आहे. अनेकांनी या घटनेचा निशेध केला आहे. आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी या भुमितच जन्म घेतला त्या भुमीतील भुमीपुत्र आपण म्हणतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी पाटलांना महिलांवरील अत्याचार केल्या संदर्भात जी कठोर शिक्षा दिली ती पाहता आज आपण प्रगत युगामध्ये फक्त जय शिवाजीच्या घोषणा देतो. मी राज्य शासनावर कुठल्याही प्रकारची टिका करीत नाही. शहर विकास आघाडी, अपक्ष, मनसे या सर्वांच्या वतीने श्रध्दांजली वाहणार आहोत. प्रसिध्दी माध्यमाव्दारे या घटनेच्या निषेधास प्रसिध्दी दिली जाते. आठवडा भरात त्या घटनेचा विसर पडतो. या घटनेस जबाबदार अधिका-यांची बदली नव्हे तर कठोर शासन केले पाहिजे. केंद्र शासनास आपण निवेदन दिले पाहिजे. फास्टट्रॅक कोर्ट मार्फत खटला चालवुन जलद गतीने न्याय झाला पाहीले. आपण या ठिकाणी एक शपथ घेवू. येथे कुठलेही पुढारी असतील या ठिकाणी फक्त निषेध करुन चालणार नाही. मी शपथ प्रदान करतो.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कर्जत येथील कोपर्डी येथील अमानुष घटनेचा सर्वांनी निषेध केला आहे. आरोपींना कुठलिही जात धर्म पंथ नसतो. या घटनेच्या चौकशीसाठी राज्य शासनामार्फत रश्मी शुक्ला या कर्तव्यदक्ष पोलीस अधिका-यांची नियुक्ती केली आहे. आरोपींना जनतेत सोडले पाहीजे. पोलीस दल निष्क्रीय झाले आहे का ? या घटनेतील आरोपींवर कोर्टात ज्यांनी अंडे फेकले मी त्यांचे स्वागत करतो व या घटनेचा निषेध करतो. मा.महापौर यांना विनंती की, एक मिनीटे श्रंध्दांजली व्यक्त करु.

मा.सौ.सुनिता कांबळे :- सर्वांच्या वतीने श्रध्दांजली व्यक्त करण्यांत यावी.

मा.सौ.मनिषा बारस्कर :- या घटनेतील मुलगी अल्पवयीन व उत्कृष्ट खेळाडू होती. या घटनेमुळे मुलिंनी घराबाहेर पडायचे की नाही असा प्रश्न पालकांसमोर उपस्थित झाला आहे. दारु अड्यांवर बंदी घातली पाहिजे. अशा नराधमांना भर चौकात फाशी दिली पाहिजे.

मा.सौ.रुपाली वारे :- माझी अशी मागणी आहे की, जे आरोपी आहेत त्यांना फाशी देवून लगेच सुटका केल्या सारखे होईल तसे न करता त्यांना तडपुन मारायला हवे. त्यांचे हातपाय तोडुन मरणाच्या यातना द्यायला हव्यात. आपणा सर्वांना विनंती की, या घटनेतील आरोपींना कठोर शिक्षा देण्यात यावी. जेणेकरुन इतर मुलींना दिलासा मिळेल व घराबाहेर पडण्यास पाठींबा मिळणार आहे.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- आरोपींना इतके कडक शासन व्हावे की आपण व्हॉटस-अप वर पहातो परदेशात कडक शासन केले जाते. या नराधमांना फाशीची शिक्षा झाल्यावर इथुनपुढे कुठल्याही मुलीला निर्भया हे नाव न देण्याची वेळ येवो याबद्दल आपण दक्षता घेवू.

मा.सौ.मालनताई ढोणे :- नगर शहरात घटना घडली. राज्यामध्ये या घटनेचे तिव्र पडसाद उमटतात. निर्भयावर जो अत्याचार केला अशा आरोपींना अशी शिक्षा करा की, प्रत्येक जण लक्षात ठेवील की असे कृत्य आपण करायला नको. सभागृहाच्या वतीने मी श्रध्दांजली अर्पण करते.

मा.श्री.कुमार वाकळे :- सर्वांच्या भावना आपण ऐकल्या राज्य शासनास आपण मनपा तर्फे पत्र पाठवण्यांत यावे. पालकमंत्र्यांच्या गावात अशा घटना घडत असतील तर सामान्य माणसाचे काय. याचा अर्थ कायद्याचा वचक कोणावरही राहीलेला नाही. आजही त्या गावात मुली शाळेत जायला घाबरतात. महिला शेतीत काम करायला घाबरतात. कर्जत हे संवेदनशील गाव आहे. आंदोलन झाल्यानंतर मंत्री त्यांच्या घरी जायला लागले असे घडायला नको. मंत्रीमहोदयांनी वेळेत अशा ठिकाणी जायला पाहिजे. भविष्यात कर्जतमध्ये वाद होण्याची शक्यता आहे. राज्यशासनाला सर्वपक्षातर्फे निवेदन देणे योग्य वाटते. दारुबंदीचा कायदा करणे आवश्यक आहे.

मा.सौ.मंगला गुंदेचा :- कोपर्डीतील नववीतील छोटया मुलिचे आरोपींनी आतोनात हाल केले. आरोपींना अशी दयावी की त्यांनी कुठल्याही भगिनीकडे अशा नजरेने पाहिले तर त्यांची असे कृत्य करण्याची हिंमत होणार नाही.

मा.श्री.दिलीप सातपुते - कर्जत कोपर्डी येथील घडलेली घटना अत्यंत दुर्देवी आहे. मा.ना.श्री.दिपक केसरकर, मा.श्री.अनिलभैय्या राठोड, मा.श्री.शशिकांत गाडे, यांनी कर्जत येथे समक्ष जावून पिडीत कुटुंबियांची भेट घेतली आहे. मा.ना.साहेबांनी हा खटला फास्ट ट्रक कोर्टात चालविण्याची घोषणा केली आहे. वकिल संघटनेचे या ठिकाणी अभिनंदन केले पाहिजे की त्यांनीही आरोपींचे वकीलपत्र कोणीही घेणार असे जाहिर केले आहे.

मा.श्री.संपत बारस्कर - कोपर्डी येथील घटना अत्यंत दुर्देवी आहे. संपूर्ण देश हादरला आहे. महाराष्ट्रातील जनतेला याचा त्रास झाला आहे. आरोपींना भर चौकात एकत्र करून ठार केले पाहिजे. आपल्या आई बहिणीबद्दल अशी घटना घडली तर काय करणार त्या करिता आपण योग्य तो निर्णय घेतला पाहिजे.

मा.महापौर सौ.सुरेखाताई कदम यांनी शपथ वाचन केले व दोन मिनीटे सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

राष्ट्रवादी नगरसेवक मा.श्री.आरिफ शेख, तसेच मा.श्री.कुमार वाकळे, मा.श्री.संपत बारस्कर, मा.श्री.सुनिल कोतकर यांनी निवेदन दिले.

मा.श्रीमती शेख मॅडम - एक जण बोला.

मा.महापौर - दिनांक १६-७-२०१६ रोजी सन्माननीय सदस्यांना दिलेल्या अजेंडा नुसार सभेचे कामकाज सुरू करावे.

मा.श्री.सचिन जाधव - मा.महापौर मॅडम यांच्या आदेशाचे पालन करावे.

मा.महापौर साहेब- एक एक जण बोला. नगरसेवक खाली बसले आहेत.

मा.श्री.स्वप्निल शिंदे - सर्व नगरसेवक तुमचे आहेत. तुम्ही पिठासीन अधिकारी आहात.

मा.श्री.सुवेंद्र गांधी - एक एक जण बोला बाकी सर्व खाली बसा.

मा.श्री.अभिषेक कळमकर- निवडणुक प्रक्रिया संदर्भात प्रश्न आहे मा.जिल्हाधिकारी विदेश दौ-यावर गेले आहेत. त्यांची प्रतिनिधी म्हणून आपणास नियुक्त केले आहे. मा.आ.श्री.संग्राम जगताप हे या सभागृहाचे सदस्य आहेत. त्यांनी दि.१८-७-२०१६ ला मा.जिल्हाधिकारी यांना मनपा अधिनियमातील कलम ३१ या विषयाबाबत पत्र व्यवहार केला होता. त्याबाबत आदेश काय आला. अतिरिक्त आयुक्त यांचेशी

कालरात्री ९-४५ वा. माझे बोलणे झाले त्या बोलण्याचे रेकॉर्डींग माझ्याकडे आहे. अतिरिक्त आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांनी जिल्हाधिकारी साहेब यांचा पत्रा संदर्भात आदेश काय आला ते सांगा.

प्र.आयुक्त श्री.वालगुडे- विषय चालू होवू दया. मी माहिती देतो.

मा.श्री.अभिषेक कळमकर- मा.आ.श्री.संग्रामभैय्या जगताप यांचे पत्र वाचून दाखवा. नगरसचिव आपण मा.आ.श्री. संग्रामभैय्या जगताप यांनी दिलेल्या पत्रावर काय आदेश दिले माहिती सांगा.

मा.महापौर साहेब- विषय वाचन करा.

मा.श्री.संजय घुले - जिल्हाधिकारी यांनी काय आदेश दिले.

प्र.आयुक्त श्री.वालगुडे - कार्यक्रमपत्रिकेनुसार अगोदर विषय वाचू दया. त्यानंतर मी माहिती देतो.

मा.श्री.सचिन जाधव - मा.महापौर साहेब यांची परवानगी घेवून एक एक जण बोला.

मा.महापौर साहेब- विषय वाचा

श्री.बनकर,लिपीक यांनी विषयाचे वाचन केले.

मा.श्री.अभिषेक कळमकर- कवडे साहेब हे विदेश दौ-यावर गेले आहेत.त्यांनी फाईल आपणाकडे दिली आहे. त्याबाबत माहिती दया.

मा.श्री.आयुक्त श्री.विलास वालगुडे- सन्माननीय नगरसेवक त्याबाबतची फाईल आजच नगर सचिव यांचेकडे दिली आहे.

मा.श्री.अनिल शिंदे -या विषयाबाबतची फाईल कधी आली,आत्ताच आली,आपण पिठासीन अधिकारी आहात.या सभागृहात निर्णय घेण्याचे सर्व अधिकार पिठासीन अधिकारी यांना आहेत.ही फाईल आत्ताच नगरसचिवांकडे दिली.असे अतिरिक्त आयुक्त यांनी सांगितले.ती फाईल नगरसचिव विभागाकडे गेली का ? मा.महापौर साहेब यांचे निदर्शनास फाईल आणली का ?

मा.श्री.आयुक्त श्री.विलास वालगुडे- नाही.

मा.श्री.अभिषेक कळमकर- मा.श्री.अनिल शिंदे यांनी या ठिकाणी सांगितले की, महापौर पिठासीन अधिकारी म्हणून निर्णय घेतील. मग आयुक्तांचा निवडणुक प्रक्रियेत सहभाग काय असतो. मा.महापौर यांनी सर्व निर्णय घ्यावेत.

मा.आयुक्त श्री.वालगुडे- टिप्पणी जी आहे ती नगर सचिव यांचेकडे दिली. ते वाचतील.

मा.श्री.सातपुते - आपल्या निवडणुक प्रक्रियेत जे गटनेत्यांकडून नामनिर्देशनासाठी जे पत्र मागवायचे आहेत त्याकरिता ५ मिनीटे वेळ देण्यात यावा.

मा.महापौर साहेब - अधिकृत गटनेत्यांनी आपल्या सदस्यांची नांवे बंद पाकिटात देण्यात यावी. यासाठी ५ मिनीटाचा वेळ देण्यात येत आहे.

मा.श्री.बाळासाहेब चंद्रशेखर मारूती बोराटे, मा.श्री.सुनिल कोतकर, मा.श्री.संपत बारस्कर, मा.श्री.संजय शेंडगे, मा.श्री.संजय लोंढे यांनी बंद पाकिट मा.महापौर साहेब यांचेकडे दिले. जमा झालेले बंद पाकिटे महासभेत दाखवून फोडण्यास सुचना केली. सभागृहात गोंधळ

मा.श्री.अनिल शिंदे- नगर सचिव अधिकृत गटनेते कोण आहेत त्यांची नांवे सांगा

मा.महापौर साहेब - नगर सचिव अधिकृत गटनेत्यांची नांवे सांगा

नगर सचिव - शिवसेना व अपक्ष आघाडीचे गटनेते मा.श्री.संजय शेंडगे, शहर विकास आघाडीचे गटनेते मा.श्री.समद खान , भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आघाडीचे गटनेते मा.श्री.संदिप कोतकर हे आहेत. सभागृहात गोंधळ

मा.श्री.श्रीपाद छिंदम उपमहापौर साहेब - एक एक जण बोला.

मा.श्री.अभिषेक कळमकर -आयुक्त व नगर सचिव तुम्ही नुतन महापौरांना अडचणीत आणणार आहात. मा.महापौरांची ही पहिलीच सभा आहे. नगरसचिव यांनी पत्र वाचून दाखवावे. आम्हाला गोंधळ घालायचा नाही. वैद्य साहेब टिप्पणी आपणाकडे आहे का ?

मा.महापौर साहेब - सर्वांनी खाली बसून घ्या. गोंधळ घालू नका.

मा.श्री.अभिषेक कळमकर - वैद्य साहेब यांनी १७ मिनीटांचा वेळ घेतला आहे. पण पत्र वाचून दाखविले नाही.याची इतिवृत्रात नोंद घ्यावी.

मा.श्री.कुमार वाकळे - या निवडणुकीस आमचा विरोध आहे. तौलानिक बळानुसार ही निवडणुक नाही. कायदेशीर प्रक्रिया ३१ (अ) प्रमाणे झालेली नाही.

मा.श्री.अनिल शिंदे - अजेंडयाची प्रत सर्व सदस्यांना मिळालेली आहे .त्यानुसारच सभेचे कामकाज सुरू आहे.

मा.श्री.संपत बारस्कर - आम्ही हायकोर्टात या निवडणूकी संदर्भात गेलो आहोत.

मा.श्री.कुमार वाकळे - नगर सचिव यांनी मनपा अधिनियमातील कलम ३१ (अ) वाचून दाखवावे. नगर सचिव यांनी सांगितले की, मला महापौर साहेब यांनी सांगितले तर कलम ३१ (अ) व जिल्हाधिकारी यांचे पत्र वाचन करील याची इतिवृत्तात नोंद घेण्यात यावी.

मा.श्री.संजय घुले - हा प्रश्न तारांकित प्रश्न उपस्थित होणार आहे.

मा.श्री.कुमार वाकळे - मा.महापौर साहेब आपण नगर सचिव यांना ३१ अ चे वाचन करायला सांगा म्हणजे सर्वांची शंका निघेल. व जनतेस ही कळेल. कलम ३१ अ का वाचत नाही.

मा.श्री.स्वप्निल शिंदे - नगरच्या जनतेला कळू दया ३१ अ कलम काय आहे.

मा.महापौर साहेब- दिनांक १६-७-२०१६ च्या अजेंडयानुसार कामकाज सुरू आहे. सभागृहात गोंधळ करु नका.

मा.श्री.अभिषेक कळमकर-उपमहापौर साहेब तुम्ही नगर सचिव यांना आदेश दया उभे राहून वाचन करा.

मा.श्री.योगिराज गाडे - महिलांचा सन्मान करा. सगळे शांत बसा. गोंधळ घालू नका.

मा.श्री.कुमार वाकळे - आज स्थायी समिती सदस्यांची निवड होती. त्यामध्ये गोंधळ होत आहे. नगर सचिवांनी विषय पत्रिका सोबत तौलानिक तक्ता जोडलेला आहे. तो आम्हाला घरी आला नाही. नगर सचिव यांनी ३१ (अ) वाचावा. मा.महापौर माझ्या मोठया भगिनी सारख्या आहेत. ३१ अ चे वाचन केल्यास सगळया शंका दूर होतील. आम्हाला वाईट वाटणार नाही. आम्ही जे पत्र दिले ते जनते समोर वाचावे. इथूनच सर्व सामान्य जनतेस संदेश जातो. तुम्ही चुकीची प्रक्रिया करणार नाही. तुम्ही नगरसचिव यांना ३१ अ चे वाचन करण्यास परवानगी दयावी. नगरसचिवांनी जो तक्ता आम्हाला दिला तो आम्ही आपणास दाखवून प्रशासनाच्या चुका झाल्या आहेत. फक्त ३१ अ कलम नगर सचिव यांनी वाचून दाखवावे. या नंतर एकही सदस्य उठणार नाही व गोंधळ घालणार नाही.

मा.महापौर साहेब- कलम ३१ अ वाचून दाखवा.

नगर सचिव - मा.महापौर यांनी दिलेल्या आदेशानुसार ३१ अ चे वाचन करतो.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३१ -अ. प्रमाणशीर प्रतिनिधित्व देउन समित्यांवर - नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे :- कोणत्याही समितीवरील पालिका सदस्याची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाव्दारे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात अथवा तदन्वये केलेल्या नियमात किंवा उपविधींमध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, महानगरपालिकेव्दारे या समित्यांवर केली जाणारी

पालिका सदस्यांची नियुक्ती ही, पोट-कलम (२) च्या तरतुदींनुसार पालिका सदस्यांचे नाम निर्देशन करून करण्यात येईल- मग ही नियुक्ती नियमित पदावरील असो किंवा नैमित्तीक रिक्त पदावरील असो -

(अ) स्थायी समिती,

(ब) परिवहन समिती,

(क) कलम ३० अन्वये नियुक्त केलेली कोणतीही विशेष समिती,

(ड) कलम ३१ अन्वये नियुक्त केलेली कोणतीही तदर्थ समिती,

मा.श्री.कुमार वाकळे - संपत बारस्कर यांनी गटनेता म्हणून जे स्थायी समिती निवडीचे पत्र दिले ते पत्र या नंतर वाचून दाखवा.

मा.महापौर साहेब-मा.श्री.संपत बारस्कर गटनेता असल्याचे विभागीय आयुक्त कार्यालयाकडून पत्र आले आहे का ?

मा.श्री.अनिल शिंदे - नगर सचिव यांनी कलम ३१ अ वाचून दाखविले व सदस्यांचे समाधान झाले आहे.

मा.श्री.स्वप्निल शिंदे - नगर सचिव यांनी सर्व गटनेते विरोधीपक्ष नेता यांची बैठक घेवून सल्लामसलत करावी अशी तरतूद आहे.

मा.श्री.अभिषेक कळमकर - कलम ३१ अ चे वाचन केल्यानंतर वैद्य साहेब यांना प्रश्न विचारायचे आहेत त्याला परवानगी मिळावी.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३१ -अ. (२) पुढे वाचन सुरु - समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचारविनिमय करुन शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील :

परंतु, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांचे तौलनिक संख्याबळ हे, प्रथमतः पालक सदस्यांच्या एकूण संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तद्नंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांच्या पालिका सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल, अशा प्रकारे आलेली संख्या ही त्या-त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल. अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेऊन, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला जागा वाटून देण्यात येतील. अशा रीतीने जागा वाटून दिल्यानंतर, एक किंवा अधिक जागा वाटून द्यावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वात मोठया अपूर्णांक संख्येपासून सुरुवात करुन तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला प्रत्येकी एक याप्रमाणे वाटून देण्यात येतील :

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य आर्हता अधिनियम १९८६ (१९८७ चा महा.२०) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरीता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र येऊन आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर, अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या

सदस्यांना, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काहीही आघाडी किंवा फ्रंट निवडणुकीपूर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील.

(३) अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल.

मा.श्री.स्वप्निल शिंदे - ३१ अ २ परत वाचा.

मा.श्री.कुमार वाकळे - मी बोलयची संधी मिळणे बाबत विनंती केली होती. परंतु मला बोलू दिले नाही. आपण चुकीचे करत आहात. (सभागृहात गोंधळ).

मा.श्री.गणेश कवडे - मा.श्री.अभिषेक कळमकर, मा.श्री.सुनिल कोतकर, मा.श्री.संजय घुले,मा.श्री.स्वप्निल शिंदे ,मा.श्री.संपत बारस्कर गोंधळ घालू नका कामकाजाची कागदपत्रे फाडू नका. महिला महापौर आहेत. अरवाच्य भाषेत बोलू नका. तुम्हांला सभागृह चालू दयायचे की नाही हे तरी एकदा सांगा.

मा.श्री.मनोज दुलम - मा.महापौर साहेब सभागृहासमोर बराच वेळ चर्चा चालू आहे तथापी विरोधी पक्षाचे नगर सेवक गडबड गोधंळ करून चर्चा होवू देत नाही. मा.सभागृहात या पूर्वी शहर विकास आघाडीचे २२ सदस्य होते. तदनंतर काळात काही नगरसेवक मयत झाले व काही अपात्र ठरल्यामुळे संबंधीत वॉर्डामध्ये रितसर पोट निवडणूक झालेली आहे. सदर निवडणूकीमध्ये वेगवेगळया पक्षाचे उमेदवार निवडूण आलेले आहे. सद्यपरिस्थितीत नगर शहर विकास आघाडीचे फक्त १९ सदस्य आहेत. त्यामुळे तौलानिक संख्याबळाचा विचार करता पक्षनिहाय नामनिर्देशीत करावयाची सदस्य संख्या योग्य आहे. तसेच मा.सभागृहासमोर संबंधीत पक्षाचे अधिकृत गट नेते जे आहेत त्यांनी नामनिर्देशन केल्याप्रमाणे नामनिर्देशन करणे योग्य होईल असे चर्चेत सांगितले व बंद पाकिटात अधिकृत मा.गटनेत्यांनी नामनिर्देशन केल्या प्रमाणे सदस्यांची नामनिर्देशन करणे योग्य होईल.

मा.श्री.संजय शेंडगे - महापौर साहेब, सभागृहात झालेल्या चर्चे प्रमाणे तीन सदस्यांना मा.महासभेतून नामनिर्देशन करण्यात यावे असे सुचवले.

मा.श्री.संजयकुमार लोंढे - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आघाडीचे अधिकृत गटनेते मा.श्री.संदिप भानुदास कोतकर यांच्याकडून कोणतेही पत्र प्राप्त न झाल्याने संबंधीत पक्षाच्या सदस्यांचे नामनिर्देशन महासभेतून करण्यात यावी असे सुचविण्यात आले.

सबब प्रशासकीय प्रस्तावानुसार शहर विकास आघाडीचे अधिकृत गट नेते मा.श्री.खान समद वहाब यांनी नामनिर्देशीत केलेले सदस्य १) मा.श्री.बाळासाहेब उर्फ चंद्रशेखर मारूती बोराटे २)मा.श्रीमती कलावती सुर्यभान शेळके ३) मा.सौ.सुनिता किसन भिंगारदिवे यांची नांवे नामनिर्देशीत केली. शिवसेना व अपक्ष विकास आघाडीचे अधिकृत गट नेते मा.श्री.संजय शेंडगे यांनी मा.श्री.सचिन तुकाराम जाधव यांचे नावाने नामनिर्देशन केले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आघाडीचे अधिकृत गटनेते मा.श्री.संदिप भानुदास कोतकर यांच्याकडून कोणतेही पत्र प्राप्त न झाल्याने महासभेने मा.श्री.मुदस्सर जहॉगिर शेख यांचे नांव महासभेतून नामनिर्देशीत करण्यात आले. तसेच मा.विरोधी पक्ष नेते मा.श्री.संजय शेंडगे यांनी पुढील प्रमाणे तीन सदस्यांची नांवे महासभेतून नामनिर्देशीत केलेली १) मा.श्री.दिलीप नानाभाउ सातपुते २) मा.श्री.मनोज लक्ष्मण दुलम ३) मा.सौ.सुनिता भगवान फुलसौंदर यांची नांवे नामनिर्देशीत करण्यात यावी. यांस नगरसेवक मा.श्री. अनिल शिंदे यांनी अनुमोदन दिले.

---*---

**ठराव :-**

ठरविण्यांत येते की, पक्षीय बलाबला प्रमाणे व तौलनिक संख्याबळ व संबंधीत पक्षाचे नोंदणीकृत व अधिकृत मा.गटनेत्यांनी नामनिर्देशनाव्दारे सुचविलेल्या प्रमाणे तसेच मा.महासभेस प्राप्त झालेल्या

प्रस्तावानुसार व महासभेत झालेल्या चर्चेनुसार व मा.सदस्यांच्या मा.महासभेतील सुचनेनुसार पुढील ८ सदस्यांची मा.स्थायी समितीच्या सदस्यपदी मा.महासभेने मान्यता दिल्याचे विधीग्राहयरित्या नामनिर्देशनाव्दारे नेमणुक झाल्याचे मी घोषित करीत आहे.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | मा.श्री.बाळासाहेब चंद्रशेखर मारुती बोराटे | शहर विकास आघाडी |
| २ | मा.श्रीमती.कलावती सुर्यभान शेळके | शहर विकास आघाडी |
| ३ | मा.सौ.सुनिता किसन भिंगारदिवे | शहर विकास आघाडी |
| ४ | मा.श्री.सचिन तुकाराम जाधव | शिवसेना व अपक्ष विकास आघाडी |
| ५ | मा.श्री.मुदस्सर जहॉगिर शेख | महासभेमधुन (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आघाडीच्या गटनेत्याचे पत्र नसल्याने) |
| ६ | मा.श्री.दिलीप नानाभाउ सातपुते | महासभेमधुन |
| ७ | मा.श्री.मनोज लक्ष्मण दुलम | महासभेमधुन |
| ८ | मा.सौ.सुनिता भगवान फुलसौंदर | महासभेमधुन |

सुचक : मा.श्री. संजय छगनराव शेंडगे

अनुमोदक : मा.श्री. अनिल माधवराव शिंदे

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर तथा पिठासीन अधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका.

| अ.क्र. | पक्ष /आघाडी / | नेमावयाच्या सदस्याचे नांव |
|---|---|---|
| १ | शिवसेना अपक्ष नगरसेवकांची आघाडी, ३ सदस्य | मा.श्री.अनिल वसंतराव बोरुडे |
| | | मा.सौ.छाया सुरेश तिवारी |
| | | मा.सौ.विद्या दिपक खैरे |
| २ | भारतीय जनता पार्टी , २ सदस्य | मा.श्री.श्रीपाद शंकरराव छिंदम |
| | | मा.सौ.उषा शिवाजीराव नलवडे |
| ३ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आघाडी, १ सदस्य | मा.सौ.रुपाली निखिल वारे |
| ४ | शहर विकास आघाडी, १ सदस्य | मा.श्री.समद वहाब खान |
| ५ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना, १ सदस्य | मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले |

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव विभाग.-
दिनांक : १६/०७/२०१६.

प्रसिध्दी अधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

**विषय : अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
मा.स्थायी समितीच्या आठ सदस्यांची निवड प्रक्रिया कामी सभेचे व्हीडीओ चित्रीकरण करणे बाबत...

कळविण्यांत येते की, बुधवार दिनांक २०-०७-२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता नविन प्रशासकिय इमारत, पहिला मजला, औरंगाबाद रोड येथील **महानगरपालिकेच्या सभागृहात** मा.स्थायी समितीच्या आठ सदस्यांची निवड प्रक्रिया कामी सभेचे आयोजन करण्यांत आले आहे.

तरी बुधवार दिनांक २०/०७/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासुन सभेचे कामकाज संपेपर्यंत व्हीडीओ चित्रीकरणाची व्यवस्था करण्यांत यावी.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.आयुक्त साो, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव.

प्रति,
पोलीस निरीक्षक,
तोफखाना पोलिस स्टेशन,
अहमदनगर.

विषय : **बुधवार दिनांक २०/०७/२०१६** रोजी होणा-या अहमदनगर महानगरपालिकेच्या
मा.विशेष सभेसाठी पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, **बुधवार दिनांक** २०/०७/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सभा औरंगाबाद रोड येथील **नविन प्रशासकीय इमारतीमधील " महानगरपालिका सभागृह "** येथे होणार आहे.

तरी सदर दिवशी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन सभागृहास पुरेसा पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत विनंती आहे.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.पोलीस अधिक्षक, पोलिस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रति,
१) मा.श्री.खान समद वहाब,गटनेता,शहर विकास आघाडी,
२) मा.श्री.संदिप भानुदास कोतकर, गट नेता,भारतीय राष्ट्रीय काँग्रेस,
३) मा.श्री.संजय छगनराव शेंडगे,गट नेता,शिवसेना व अपक्ष विकास आघाडी,
अहमदनगर.

**विषय : अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीवर सदस्य नामनिर्देशित करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती ...**

**संदर्भ :** महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक -संकिर्ण २०१०/ प्र.क्र. ८५/नवि-३२, मंत्रालय मुंबई दिनांक ०६ जुलै २०१०

महोदय,

विषयांकित प्रकरणी विनंतीपुर्वक कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदींनुसार मा.स्थायी समितीचे आठ सदस्य निवृत्त झाले कारणाने त्यांचे जागी नामनिर्देशनाने नियुक्ती करणेकरीता बुधवार दिनांक २०/०७/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.महानगरपालिकेच्या विशेष सभेचे आयोजन केले आहे.

या सभेमध्ये महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीवर सदस्य नामनिर्देशित करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती यासोबत जोडलेल्या संदर्भीय परिपत्रकामध्ये मध्ये नमुद केली आहे. त्याची झेरॉक्स प्रत या सोबत जोडुन आपणांस पाठवित आहोत.

तरी आपले स्तरावरुन सदरचे परिपत्रक आपल्या गटातील सर्व महानगरपालिका सदस्यांच्या निदर्शनास आणावे व त्यानुसार कार्यवाही करावी. हि नम्र विनंती.

आपला विश्वासु,

**सोबत : संदर्भीय पत्राची झेरॉक्स प्रत.**

**प्र.नगरसचिव,**
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपमहापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.अति.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपायुक्त (सा) साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपायुक्त (कर) साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव/एएमसी.-
दिनांक : १६ / ०७ / २०१६.

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सभा **बुधवार दिनांक २०/०७/२०१६** रोजी सकाळी ११.०० वाजता औरंगाबाद रोड येथील **"नविन प्रशासकीय इमारतीमधील महानगरपालिका सभागृह "** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| २) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. ती जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. |
| ३) | इलेक्ट्रीक सुपरवायझर | : | यांचेकडेस माहितीस व वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची सुध्दा व्यवस्था करण्यात यावी. |
| ४) | श्री.एल.डी.बनकर, ब्लड बॅक, कै.बा.दे.दवाखाना | : | माहितीस व महानगरपालिका सभागृहात सभेपुर्वी उपस्थित राहुन सभेच्या वेळेस विषय वाचन करावे. |
| ५) | १) श्री.डी.आर.ढवळे, स्वीय सहाय्यक, आयुक्त कार्यालय<br>२)सौ.सी.एस.खलचे,लेखा विभाग | : | आपण सभेपुर्वी सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |
| ६) | श्री.अशोक चेन्नुर, पाणीपुरवठा विभाग | : | सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ७) | मनपा हवालदार | : | यांस माहितीस व वरील प्रमाणे सभा होणार असल्याने त्याबाबत नोंद घेऊ न सभागृहात मा.सभासदांना बसण्यासाठी टेबल, खुर्च्यांची व्यवस्था नेहमीप्रमाणे करावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

कार्यालयीन आदेश.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव/एएमसी.-
दिनांक : १८ / ०७ /२०१६.

१) श्री.बंडू इवळे, महापौर कार्यालय,
२) श्री.शंकर बहिरवाडे, आयुक्त कार्यालय,
३) श्री.शांतवन बडेकर, उपायुक्त कार्यालय,
४) श्री.संदीप फाळके, नगररचना विभाग,
५) श्री.ज्ञानेश्वर काटकर, सामान्य प्रशासन विभाग.
६) श्री. मच्छिंद्र शिंदे, उपमहापौर कार्यालय,
७) श्री.ए.जी.झारखंडे, म.बा.क.समिती कार्यालय,
८) श्री.सदाशिव दरंदले, आस्थापना विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सभा **बुधवार दिनांक २०/०७/२०१६** रोजी अनुक्रमे सकाळी ११.०० वाजता **औरंगाबाद रोड येथील नविन प्रशासकीय इमारतीमधील " महानगरपालिका सभागृह "** येथे होणार आहे.

तरी आपण सकाळी १०.०० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव/एएमसी.-
दिनांक : १६ / ०७ /२०१६.

शहरअभियंता,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा **बुधवार दिनांक २०/०७/२०१६** रोजी सकाळी ११.०० वाजता **औरंगाबाद रोड येथील नविन प्रशासकीय इमारतीमधील " महानगरपालिका सभागृह "** येथे होणार आहे. तरी आपण या सभेकरीता स्टेजवरील व्यवस्थेसह हॉलमधील मा.नगरसेवकांच्या संख्येनुसार तसेच विभाग प्रमुख, पत्रकार व प्रेक्षक गॅलरीमधील नागरीक यांच्या संख्येनुसार टेबल-खुर्च्या, मोठे फॅन, डायस, साऊंड सिस्टीम स्पिकर व माईक यांची व्यवस्था न चुकता नियोजित वेळेपुर्वी करावी.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सादर.

विषय :- मा.स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या आठ सदस्यांच्या जागी नवीन सदस्यांची नेमणूक करणेबाबत.

**प्रमाणशीर प्रतिनिधित्व देण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे.**

**--*--**

**३१-अ. प्रमाणशीर प्रतिनिधित्व देउन समित्यांवर नामनिर्देशनाने नियुक्ती करणे :-**

(१) कोणत्याही समितीवरील पालिका सदस्याची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाव्दारे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात अथवा तदन्वये केलेल्या नियमात किंवा उपविधींमध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, महानगरपालिकेव्दारे या समित्यांवर केली जाणारी पालिका सदस्यांची नियुक्ती ही, पोटकलम (२) च्या तरतुदींअनुसार पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करून करण्यात येईल- मग ही नियुक्ती नियमित पदावरील असो किंवा नैमित्तीक रिक्त पदावरील असो -

(अ) स्थायी समिती,

(ब) परिवहन समिती,

(क) कलम ३० अन्वये नियुक्त केलेली कोणतीही विशेष समिती,

(ड) कलम ३१ अन्वये नियुक्त केलेली कोणतीही तदर्थ समिती,

(२) समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचारविनिमय करुन शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशनकरील :

परंतु, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांचे तौलनिक संख्याबळ हे, प्रथमतः पालिका सदस्यांच्या एकूण संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तद्नंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांच्या पालिका सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल. अशा प्रकारे आलेली संख्या ही त्या-त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल. अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेऊन, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला जागा वाटून देण्यात येतील. अशा रीतीने जागा वाटून दिल्यानंतर, एक किंवा अधिक जागा वाटून द्यावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वात मोठया अपूर्णांक संख्येपासून सुरुवात करुन तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला प्रत्येकी एक याप्रमाणे वाटून देण्यात येतील :

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ (१९८७ चा महा.२०) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरीता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र येऊन आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा

फ्रंटची नोंदणी झाल्यावर, अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काहीही आघाडी किंवा फ्रंट निवडणुकीपूर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे लागू होतील.

(३) अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्भवल्यास त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल.

प्रति,

१) मा.श्री.खान समद वहाब,गटनेता,शहर विकास आघाडी,

२) मा.श्री.संदिप भानुदास कोतकर, गट नेता,भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस,
अहमदनगर.

**विषय : अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीवर सदस्य नामनिर्देशित करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती ...**

**संदर्भ :** जा.क्र.नगरसचिव /AMC/४२०६ दिनांक १६/०७/२०१६ रोजीचे पत्र.

महोदय,

विषयांकित प्रकरणी विनंतीपुर्वक कळविण्यांत येते की, आपणांस पाठविलेले वर नमुद पत्र अभिलेखातील जुन्या नोंदीमुळे चुकीने पाठविल्याने ते रद्द समजण्यांत यावे.

आपला विश्वासु,

**प्र.नगरसचिव**,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपमहापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.अति.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपायुक्त (सा) साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपायुक्त (कर) साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

प्रति,
१) मा.श्री.संपत विजय बारस्कर, गटनेता, शहर विकास आघाडी
२) मा.सौ.सुवर्णा संदिप कोतकर, गट नेता,भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस,
३) मा.श्री.संजय छगनराव शेंडगे, गटनेता, शिवसेना व अपक्ष विकास आघाडी,
अहमदनगर.

**विषय : अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीवर सदस्य नामनिर्देशित करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती ...**

**संदर्भ :** महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक -संकिर्ण २०१०/ प्र.क्र. ८५/नवि-३२, मंत्रालय मुंबई दिनांक ०६ जुलै २०१०

महोदय,

विषयांकित प्रकरणी विनंतीपुर्वक कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदींनुसार मा.स्थायी समितीचे आठ सदस्य निवृत्त झाले कारणाने त्यांचे जागी नामनिर्देशनाने नियुक्ती करणेकरीता बुधवार दिनांक २०/०७/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.महानगरपालिकेच्या विशेष सभेचे आयोजन केले आहे.

या सभेमध्ये महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीवर सदस्य नामनिर्देशित करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती यासोबत जोडलेल्या संदर्भीय परिपत्रकामध्ये मध्ये नमुद केली आहे. त्याची झेरॉक्स प्रत या सोबत जोडुन आपणांस पाठवित आहोत.

तरी आपले स्तरावरुन सदरचे परिपत्रक आपल्या गटातील सर्व महानगरपालिका सदस्यांच्या निदर्शनास आणावे व त्यानुसार कार्यवाही करावी. हि नम्र विनंती.

आपला विश्वासु,

**सोबत : संदर्भीय पत्राची झेरॉक्स प्रत.**

**प्र.नगरसचिव,**
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपमहापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.अति.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपायुक्त (सा) साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपायुक्त (कर) साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

`

प्रति,
मा.श्री.संपत विजय बारस्कर,
नगरसेवक,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

**विषय : अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीवर सदस्य नामनिर्देशित करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती ...**

**संदर्भ :** जा.क्र.नगरसचिव/वशि १३८ दिनांक १८/०७/२०१६ रोजीचे या कार्यालयाचे पत्र.

महोदय,

विषयांकित प्रकरणी विनंतीपुर्वक कळविण्यांत येते की, संदर्भीय पत्रान्वये आपणाला गटनेता या नात्याने पत्र पाठविले होते. तथापि "गटनेता" असा उल्लेख केलेले मा.विभागीय आयुक्त यांचे पत्र पहाता त्यावर पत्रामध्ये नमुद श्री.समद वहाब खान हे नाव असल्याने आपणांस दिलेले गटनेते बाबतचे संदर्भीय पत्र कृपया रद्द समजावे. व श्री.समद वहाब खान यांचे व्दारे मा.स्थायी समिती करीता सदस्य नियुक्तीचे नामनिर्देशन सादर करावे.

आपला विश्वासु,

**प्र.नगरसचिव,**
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपमहापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.अति.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपायुक्त (सा) साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपायुक्त (कर) साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
नगरसचिव विभाग -
दिनांक : २१ / ०७ /२०१६.

विषय : **बुधवार दि. २०/०७/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता** झालेल्या मा.विशेष सर्वसाधारण सभा क्र. २ सभेच्या चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८५-२ सी. आर.६८-८६-युडी, १४ दिनांक २९ जुलै १९९६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. ३४ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक २०/०७/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता** औरंगाबाद रोड येथील नविन प्रशासकीय इमारतीमधील महानगरपालिका सभागृह, अहमदनगर महानगरपालिका येथे झाली आहे.

सदर महानगरपालिका सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.१,८६०/-(अक्षरी रक्कम रुपये एक हजार आठशे साठ फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या *** सभेचे चहा नाष्टा बील *** या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च श्री.एम.एम.वैद्य, नगरसचिव, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश श्री.एम.एम.वैद्य, यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

**तरतुद :**
**पुर्वीचा खर्च :**
**हया बीलात दाखविलेला खर्च :**
**उपलब्ध शिल्लक :**

प्र.नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रति,
मा.सौ.सुवर्णा संदिप कोतकर,
नगरसेविका,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

**विषय : अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीवर सदस्य नामनिर्देशित करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती ...**

**संदर्भ :** जा.क्र.नगरसचिव/वशि १३८ दिनांक १८/०७/२०१६ रोजीचे या कार्यालयाचे पत्र.

महोदया,

विषयांकित प्रकरणी विनंतीपुर्वक कळविण्यांत येते की, संदर्भीय पत्रान्वये आपणाला गटनेता या नात्याने पत्र पाठविले होते. तथापि "गटनेता" असा उल्लेख केलेले मा.विभागीय आयुक्त यांचे पत्र पहाता त्यावर पत्रामध्ये नमुद श्री.संदीप भानुदास कोतकर हे नाव असल्याने आपणांस दिलेले गटनेते बाबतचे संदर्भीय पत्र कृपया रद्द समजावे. व श्री.संदीप भानुदास कोतकर यांचे व्दारे मा.स्थायी समिती करीता सदस्य नियुक्तीचे नामनिर्देशन सादर करावे.

आपला विश्वासु,

**प्र.नगरसचिव,**
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपमहापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.अति.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपायुक्त (सा) साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपायुक्त (कर) साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

प्रति,
मा.आयुक्त साहेब,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

विषय :- मा.स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या आठ सदस्यांच्या जागी नवीन सदस्यांची नेमणूक करणेबाबत.

संदर्भ :- दिनांक १६/०७/२०१६ रोजीची विशेष महासभेची सूचना व विषयपत्रिका.

महोदय,

आपणांस याव्दारे कळविण्यांत येते की, दिनांक १६/०७/२०१६ रोजी स्थायी समिती वरील ८ सदस्य नियुक्ती करीता विशेष सभा आयोजित केली आहे. त्यामध्ये नमूद केलेले सदस्य मुल्य व नियुक्त करावयाचे सदस्य यावर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या शहर विकास आघाडीने आक्षेप घेवुन त्यामध्ये बदल करण्याबाबत पत्र दिले आहे. सभेच्या सूचनेबरोबर दिलेले

मुल्यांकन व नियुक्त करावयाची सदस्य संख्या बरोबर आहे. हे पत्र दिले असल्याने या ३ (तीन) जागांवर नियुक्त करावयाच्या सदस्यांच्या संख्येबाबत प्रश्न उद्‌भवला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३१ अ (३) नुसार "अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशीत करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास त्या बाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल अशी तरतूद आहे. "

त्यामुळे वर नमूद कलमानुसार ३ सदस्यांची निवड महानगरपालिकेतून म्हणजेच महासभेतून भरण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच नगरसचिव कार्यालयाकडुन दिनांक १८/०७/२०१६ रोजी सादर केलेला सुधारीत प्रस्ताव त्वरीत रद्द करावा.

आपला विश्वासु

प्रत : नगरसचिव, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रति,
मा.श्री.संदिप भानुदास कोतकर,
गट नेता,भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस,
अहमदनगर.

**विषय : अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीवर सदस्य नामनिर्देशित करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती ...**

**संदर्भ :** जा.क्र.नगरसचिव /वशि/१३७ दिनांक १८/०७/२०१६ रोजीचे पत्र.

महोदय,

विषयांकित प्रकरणी विनंतीपुर्वक कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेकडे मा.विभागीय आयुक्त यांचेकडुन प्राप्त झालेल्या पत्रामध्ये आपल्या नावाचा उल्लेख कॉंग्रेस पक्षाचे गटनेता असा असल्याचे आढळुन येत असल्यामुळे आपणांस पाठविलेले वरिल संदर्भीय पत्र रद्द करण्यांत आले आहे.

तरी आपण स्थायी समितीच्या सदस्य म्हणुन आपल्या पक्षाचे कडील सदस्यांचे नांवे नामनिर्देशित करावीत हि विनंती.

आपला विश्वासु,

**प्र.नगरसचिव**,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपमहापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.अति.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपायुक्त (सा) साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.उपायुक्त (कर) साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

पक्षाचे, गटाचे, आघाडीचे अथवा फ्रंटचे नविना सदस्य नामीर्देशनाव्दारे स्थायी समितीवर नियमानुसार नेमणेकामी प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयार्थ सादर करण्याच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, उपरोक्त प्रस्तावित केल्यानुसार मा.स्थायी समिती सभेच्या रिक्त जागा ८ भरणेकामी, ५ जागा पक्षीय बलानुसार व ३ जागा महासभेच्या निर्णयाद्वारा नियुक्ती बाबत महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ३१ (अ) २ व ३ नुसार उचित कार्यवाहीस्तव प्रस्ताव मा.महासभेपुढे पाठविणेस स.सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त श्री.विलास वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या दिनांक ११-७-२०१६ च्या फेर सादर अहवालाप्रमाणे प्रस्ताव मा.महासभेकडे सादर करणेकामी मान्यतेस्तव.

यावर मा.प्र.आयुक्त श्री.अनिल कवडे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर सौ.सुरेखाताई कदम साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

---*---

**चर्चा :-**

मा.श्रीमती.नसीम शेख :- कर्जत मधील कोपर्डी येथील जी घटना घडली त्याबद्दल मला श्रध्दांजली वाहायची व दोन शब्द बोलायचे. श्रंध्दांजलीपर भाषण केले.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- एक आठवडयापुर्वी देशाला हादरुन टाकणारी घटना घडली आहे. अनेकांनी या घटनेचा निशेध केला आहे. आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी या भुमितच जन्म घेतला त्या भुमीतील भुमीपुत्र आपण म्हणतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी पाटलांना महिलांवरील अत्याचार केल्या संदर्भात जी कठोर शिक्षा दिली ती पाहता आज आपण प्रगत युगामध्ये फक्त जय शिवाजीच्या घोषणा देतो. मी राज्य शासनावर कुठल्याही प्रकारची टिका करीत नाही. शहर विकास आघाडी, अपक्ष, मनसे या सर्वांच्या वतीने श्रध्दांजली वाहणार आहोत. प्रसिध्दी माध्यमाव्दारे या घटनेच्या निषेधास प्रसिध्दी दिली जाते. आठवडा भरात त्या घटनेचा विसर पडतो. या घटनेस जबाबदार अधिका-यांची बदली नव्हे तर कठोर शासन केले पाहिजे. केंद्र शासनास आपण निवेदन दिले पाहिजे. फास्टट्रॅक कोर्ट मार्फत खटला चालवुन जलद गतीने न्याय झाला पाहीले. आपण या ठिकाणी एक शपथ घेवू. येथे कुठलेही पुढारी असतील या ठिकाणी फक्त निषेध करुन चालणार नाही. मी शपथ प्रदान करतो.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कर्जत येथील कोपर्डी येथील अमानुष घटनेचा सर्वांनी निषेध केला आहे. आरोपींना कुठलिही जात धर्म पंथ नसतो. या घटनेच्या चौकशीसाठी राज्य शासनामार्फत रश्मी शुक्ला या कर्तव्यदक्ष पोलीस अधिका-यांची नियुक्ती केली आहे. आरोपींना जनतेत सोडले पाहीजे. पोलीस दल निष्क्रीय झाले आहे का ? या घटनेतील आरोपींवर कोर्टात ज्यांनी अंडे फेकले मी त्यांचे स्वागत करतो व या घटनेचा निषेध करतो. मा.महापौर यांना विनंती की, एक मिनीटे श्रंध्दांजली व्यक्त करु.

मा.सौ.सुनिता कांबळे :- सर्वांच्या वतीने श्रध्दांजली व्यक्त करण्यांत यावी.

मा.सौ.मनिषा बारस्कर :- या घटनेतील मुलगी अल्पवयीन व उत्कृष्ट खेळाडू होती. या घटनेमुळे मुलिंनी घराबाहेर पडायचे की नाही असा प्रश्न पालकांसमोर उपस्थित झाला आहे. दारु अड्यांवर बंदी घातली पाहिजे. अशा नराधमांना भर चौकात फाशी दिली पाहिजे.

मा.सौ.रुपाली वारे :- माझी अशी मागणी आहे की, जे आरोपी आहेत त्यांना फाशी देवून लगेच सुटका केल्या सारखे होईल तसे न करता त्यांना तडपुन मारायला हवे. त्यांचे हातपाय तोडुन मरणाच्या यातना द्यायला हव्यात. आपणा सर्वांना विनंती की, या घटनेतील आरोपींना कठोर शिक्षा देण्यात यावी. जेणेकरुन इतर मुलींना दिलासा मिळेल व घराबाहेर पडण्यास पाठींबा मिळणार आहे.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- आरोपींना इतके कडक शासन व्हावे की आपण व्हॉटस-अप वर पहातो परदेशात कडक शासन केले जाते. या नराधमांना फाशीची शिक्षा झाल्यावर इथुनपुढे कुठल्याही मुलीला निर्भया हे नाव न देण्याची वेळ येवो याबद्दल आपण दक्षता घेवू.

मा.सौ.मालनताई ढोणे :- नगर शहरात घटना घडली. राज्यामध्ये या घटनेचे तिव्र पडसाद उमटतात. निर्भयावर जो अत्याचार केला अशा आरोपींना अशी शिक्षा करा की, प्रत्येक जण लक्षात ठेवील की असे कृत्य आपण करायला नको. सभागृहाच्या वतीने मी श्रध्दांजली अर्पण करते.

मा.श्री.कुमार वाकळे :- सर्वांच्या भावना आपण ऐकल्या राज्य शासनास आपण मनपा तर्फे पत्र पाठवण्यांत यावे. पालकमंत्र्यांच्या गावात अशा घटना घडत असतील तर सामान्य माणसाचे काय. याचा अर्थ कायद्याचा वचक कोणावरही राहीलेला नाही. आजही त्या गावात मुली शाळेत जायला घाबरतात. महिला शेतीत काम करायला घाबरतात. कर्जत हे संवेदनशील गाव आहे. आंदोलन झाल्यानंतर मंत्री त्यांच्या घरी जायला
लागले असे घडायला नको. मंत्रीमहोदयांनी वेळेत अशा ठिकाणी जायला पाहिजे. भविष्यात कर्जतमध्ये वाद होण्याची शक्यता आहे. राज्यशासनाला सर्वपक्षातर्फे निवेदन देणे योग्य वाटते. दारुबंदीचा कायदा करणे आवश्यक आहे.

मा.सौ.मंगला गुंदेचा :- कोपर्डीतील नववीतील छोटया मुलिचे आरोपींनी आतोनात हाल केले. आरोपींना अशी दयावी की त्यांनी कुठल्याही भगिनीकडे अशा नजरेने पाहिले तर त्यांची असे कृत्य करण्याची हिंमत होणार नाही.

मा.श्री.दिलीप सातपुते :- कर्जत कोपर्डी येथील घडलेली घटना अत्यंत दुर्देवी आहे. मा.ना.श्री.दिपक केसरकर, मा.श्री.अनिलभैय्या राठोड, मा.श्री.शशिकांत गाडे, यांनी कर्जत येथे समक्ष जावून पिडीत कुटुंबियांची भेट घेतली आहे. मा.ना.साहेबांनी हा खटला फास्ट ट्रक कोर्टात चालविण्याची घोषणा केली आहे. वकिल संघटनेचे या ठिकाणी अभिनंदन केले पाहिजे की त्यांनीही आरोपींचे वकीलपत्र कोणीही घेणार असे जाहिर केले आहे.

मा.श्री.संपत बारस्कर :- कोपर्डी येथील घटना अत्यंत दुर्देवी आहे. संपूर्ण देश हादरला आहे. महाराष्ट्रातील जनतेला याचा त्रास झाला आहे. आरोपींना भर चौकात एकत्र करून ठार केले पाहिजे. आपल्या आई बहिणीबद्दल अशी घटना घडली तर काय करणार त्या करिता आपण योग्य तो निर्णय घेतला पाहिजे.

मा.महापौर सौ.सुरेखाताई कदम यांनी शपथ वाचन केले व दोन मिनीटे सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

राष्ट्रवादी नगरसेवक मा.श्री.आरिफ शेख, तसेच मा.श्री.कुमार वाकळे, मा.श्री.संपत बारस्कर, मा.श्री.सुनिल कोतकर यांनी निवेदन दिले.

मा.श्रीमती शेख मॅडम :- एक जण बोला.

मा.महापौर - दिनांक १६-७-२०१६ रोजी सन्माननीय सदस्यांना दिलेल्या अजेंडा नुसार सभेचे कामकाज सुरू करावे.

मा.श्री.सचिन जाधव :- मा.महापौर मॅडम यांच्या आदेशाचे पालन करावे.

मा.महापौर साहेब :- एक एक जण बोला. नगरसेवक खाली बसले आहेत.

मा.श्री.स्वप्निल शिंदे :- सर्व नगरसेवक तुमचे आहेत. तुम्ही पिठासीन अधिकारी आहात.

मा.श्री.सुवेंद्र गांधी :- एक एक जण बोला बाकी सर्व खाली बसा.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- निवडणुक प्रक्रिया संदर्भात प्रश्न आहे मा.जिल्हाधिकारी विदेश दौ-यावर गेले आहेत. त्यांची प्रतिनिधी म्हणून आपणास नियुक्त केले आहे. मा.आ.श्री.संग्राम जगताप हे या सभागृहाचे सदस्य आहेत. त्यांनी दि.१८-७-२०१६ ला मा.जिल्हाधिकारी यांना मनपा अधिनियमातील कलम ३१ या विषयाबाबत पत्र व्यवहार केला होता. त्याबाबत आदेश काय आला. अतिरिक्त आयुक्त यांचेशी कालरात्री ९-४५ वा. माझे बोलणे झाले त्या बोलण्याचे रेकॉर्डींग माझ्याकडे आहे. अतिरिक्त आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांनी जिल्हाधिकारी साहेब यांचा पत्रा संदर्भात आदेश काय आला ते सांगा.

प्र.आयुक्त श्री.वालगुडे :- विषय चालू होवू दया. मी माहिती देतो.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- मा.आ.श्री.संग्रामभैय्या जगताप यांचे पत्र वाचून दाखवा. नगरसचिव आपण मा.आ.श्री. संग्रामभैय्या जगताप यांनी दिलेल्या पत्रावर काय आदेश दिले माहिती सांगा.

मा.महापौर साहेब :- विषय वाचन करा.

मा.श्री.संजय घुले :- जिल्हाधिकारी यांनी काय आदेश दिले.

प्र.आयुक्त श्री.वालगुडे :- कार्यक्रमपत्रिकेनुसार अगोदर विषय वाचू दया. त्यानंतर मी माहिती देतो.

मा.श्री.सचिन जाधव :- मा.महापौर साहेब यांची परवानगी घेवून एक एक जण बोला.

मा.महापौर साहेब :- विषय वाचा

श्री.बनकर,लिपीक यांनी विषयाचे वाचन केले.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- कवडे साहेब हे विदेश दौ-यावर गेले आहेत.त्यांनी फाईल आपणाकडे दिली आहे. त्याबाबत माहिती दया.

मा.श्री.आयुक्त श्री.विलास वालगुडे :- सन्माननीय नगरसेवक त्याबाबतची फाईल आजच नगर सचिव यांचेकडे दिली आहे.

मा.श्री.अनिल शिंदे :- या विषयाबाबतची फाईल कधी आली,आत्ताच आली,आपण पिठासीन अधिकारी आहात.या सभागृहात निर्णय घेण्याचे सर्व अधिकार पिठासीन अधिकारी यांना आहेत.ही फाईल आत्ताच नगरसचिवांकडे दिली.असे अतिरिक्त आयुक्त यांनी सांगितले.ती फाईल नगरसचिव विभागाकडे गेली का ? मा.महापौर साहेब यांचे निदर्शनास फाईल आणली का ?

मा.श्री.आयुक्त श्री.विलास वालगुडे :- नाही.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- मा.श्री.अनिल शिंदे यांनी या ठिकाणी सांगितले की, महापौर पिठासीन अधिकारी म्हणून निर्णय घेतील. मग आयुक्तांचा निवडणुक प्रक्रियेत सहभाग काय असतो. मा.महापौर यांनी सर्व निर्णय घ्यावेत.

मा.आयुक्त श्री.वालगुडे :- टिप्पणी जी आहे ती नगर सचिव यांचेकडे दिली. ते वाचतील.

मा.श्री.सातपुते :- आपल्या निवडणुक प्रक्रियेत जे गटनेत्यांकडून नामनिर्देशनासाठी जे पत्र मागवायचे आहेत त्याकरिता ५ मिनीटे वेळ देण्यात यावा.

मा.महापौर साहेब :- अधिकृत गटनेत्यांनी आपल्या सदस्यांची नांवे बंद पाकिटात देण्यात यावी. यासाठी ५ मिनीटाचा वेळ देण्यात येत आहे.

मा.श्री.बाळासाहेब चंद्रशेखर मारूती बोराटे, मा.श्री.सुनिल कोतकर, मा.श्री.संपत बारस्कर, मा.श्री.संजय शेंडगे, मा.श्री.संजय लोंढे यांनी बंद पाकिट मा.महापौर साहेब यांचेकडे दिले. जमा झालेले बंद पाकिटे महासभेत दाखवून फोडण्यास सुचना केली. सभागृहात गोंधळ

मा.श्री.अनिल शिंदे :- नगर सचिव अधिकृत गटनेते कोण आहेत त्यांची नांवे सांगा

मा.महापौर साहेब :- नगर सचिव अधिकृत गटनेत्यांची नांवे सांगा

नगर सचिव :- शिवसेना व अपक्ष आघाडीचे गटनेते मा.श्री.संजय शेंडगे, शहर विकास आघाडीचे गटनेते मा.श्री.समद खान , भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आघाडीचे गटनेते मा.श्री.संदिप कोतकर हे आहेत. सभागृहात गोंधळ

मा.श्री.श्रीपाद छिंदम उपमहापौर साहेब :- एक एक जण बोला.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- आयुक्त व नगर सचिव तुम्ही नुतन महापौरांना अडचणीत आणणार आहात. मा.महापौरांची ही पहिलीच सभा आहे. नगरसचिव यांनी पत्र वाचून दाखवावे. आम्हाला गोंधळ घालायचा नाही. वैद्य साहेब टिप्पणी आपणाकडे आहे का ?

मा.महापौर साहेब :- सर्वानी खाली बसून घ्या. गोंधळ घालू नका.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- वैद्य साहेब यांनी १७ मिनीटांचा वेळ घेतला आहे. पण पत्र वाचून दाखविले नाही.याची इतिवृत्रात नोंद घ्यावी.

मा.श्री.कुमार वाकळे :- या निवडणुकीस आमचा विरोध आहे. तौलानिक बळानुसार ही निवडणुक नाही. कायदेशीर प्रक्रिया ३१ (अ) प्रमाणे झालेली नाही.

मा.श्री.अनिल शिंदे :- अजेंडयाची प्रत सर्व सदस्यांना मिळालेली आहे .त्यानुसारच सभेचे कामकाज सुरू आहे.

मा.श्री.संपत बारस्कर :- आम्ही हायकोर्टात या निवडणूकी संदर्भात गेलो आहोत.

मा.श्री.कुमार वाकळे :- नगर सचिव यांनी मनपा अधिनियमातील कलम ३१ (अ) वाचून दाखवावे. नगर सचिव यांनी सांगितले की, मला महापौर साहेब यांनी सांगितले तर कलम ३१ (अ) व जिल्हाधिकारी यांचे पत्र वाचन करील याची इतिवृत्तात नोंद घेण्यात यावी.

मा.श्री.संजय घुले :- हा प्रश्न तारांकित प्रश्न उपस्थित होणार आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- मा.महापौर साहेब आपण नगर सचिव यांना ३१ अ चे वाचन करायला सांगा म्हणजे सर्वांची शंका निघेल. व जनतेस ही कळेल. कलम ३१ अ का वाचत नाही.

मा.श्री.स्वप्निल शिंदे :- नगरच्या जनतेला कळू दया ३१ अ कलम काय आहे.

मा.महापौर साहेब :- दिनांक १६-७-२०१६ च्या अजेंडयानुसार कामकाज सुरू आहे. सभागृहात गोंधळ करु नका.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- उपमहापौर साहेब तुम्ही नगर सचिव यांना आदेश दया उभे राहून वाचन करा.

मा.श्री.योगिराज गाडे :- महिलांचा सन्मान करा. सगळे शांत बसा. गोंधळ घालू नका.

मा.श्री.कुमार वाकळे :- आज स्थायी समिती सदस्यांची निवड होती. त्यामध्ये गोंधळ होत आहे. नगर सचिवांनी विषय पत्रिका सोबत तौलानिक तक्ता जोडलेला आहे. तो आम्हाला घरी आला नाही. नगर सचिव यांनी ३१ (अ) वाचावा. मा.महापौर माझ्या मोठया भगिनी सारख्या आहेत. ३१ अ चे वाचन

केल्यास सगळया शंका दूर होतील. आम्हाला वाईट वाटणार नाही. आम्ही जे पत्र दिले ते जनते समोर वाचावे. इथूनच सर्व सामान्य जनतेस संदेश जातो. तुम्ही चुकीची प्रक्रिया करणार नाही. तुम्ही नगरसचिव यांना ३१ अ चे वाचन करण्यास परवानगी दयावी. नगरसचिवांनी जो तक्ता आम्हाला दिला तो आम्ही आपणास दाखवून प्रशासनाच्या चुका झाल्या आहेत. फक्त ३१ अ कलम नगर सचिव यांनी वाचून दाखवावे. या नंतर एकही सदस्य उठणार नाही व गोंधळ घालणार नाही.

मा.महापौर साहेब :- कलम ३१ अ वाचून दाखवा.

नगर सचिव :- मा.महापौर यांनी दिलेल्या आदेशानुसार ३१ अ चे वाचन करतो.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३१ -अ. प्रमाणशीर प्रतिनिधित्व देउन समित्यांवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे :- कोणत्याही समितीवरील पालिका सदस्याची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाव्दारे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात अथवा तदन्वये केलेल्या नियमात किंवा उपविधींमध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, महानगरपालिकेव्दारे या समित्यांवर केली जाणारी पालिका सदस्यांची नियुक्ती ही, पोट-कलम (२) च्या तरतुदींनुसार पालिका सदस्यांचे नाम निर्देशन करून करण्यात येईल- मग ही नियुक्ती नियमित पदावरील असो किंवा नैमित्तीक रिक्त पदावरील असो -

(अ) स्थायी समिती,

(ब) परिवहन समिती,

(क) कलम ३० अन्वये नियुक्त केलेली कोणतीही विशेष समिती,

(ड) कलम ३१ अन्वये नियुक्त केलेली कोणतीही तदर्थ समिती,

मा.श्री.कुमार वाकळे :- संपत बारस्कर यांनी गटनेता म्हणून जे स्थायी समिती निवडीचे पत्र दिले ते पत्र या नंतर वाचून दाखवा.

मा.महापौर साहेब :-मा.श्री.संपत बारस्कर गटनेता असल्याचे विभागीय आयुक्त कार्यालयाकडून पत्र आले आहे का ?

मा.श्री.अनिल शिंदे :- नगर सचिव यांनी कलम ३१ अ वाचून दाखविले व सदस्यांचे समाधान झाले आहे.

मा.श्री.स्वप्निल शिंदे :- नगर सचिव यांनी सर्व गटनेते विरोधीपक्ष नेता यांची बैठक घेवून सल्लामसलत करावी अशी तरतूद आहे.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- कलम ३१ अ चे वाचन केल्यानंतर वैद्य साहेब यांना प्रश्न विचारायचे आहेत त्याला परवानगी मिळावी.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३१ -अ. (२) पुढे वाचन सुरु - समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्ष-नेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचारविनिमय करुन शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील :

परंतु, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांचे तौलनिक संख्याबळ हे, प्रथमतः पालक सदस्यांच्या एकूण संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण

संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तद्नंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांच्या पालिका सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल, अशा प्रकारे आलेली संख्या ही त्या-त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल. अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेऊन, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला जागा वाटून देण्यात येतील. अशा रीतीने जागा वाटून दिल्यानंतर, एक किंवा अधिक जागा वाटून द्यावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वात मोठया अपूर्णांक संख्येपासून सुरुवात करुन तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला प्रत्येकी एक याप्रमाणे वाटून देण्यात येतील :

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य आर्हता अधिनियम १९८६ (१९८७ चा महा.२०) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरीता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र येऊन आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर, अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काहीही आघाडी किंवा फ्रंट ि-नवडणुकीपूर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील.

(३) अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल.

मा.श्री.स्वप्निल शिंदे :- ३१ अ २ परत वाचा.

मा.श्री.कुमार वाकळे :- मी बोलयची संधी मिळणे बाबत विनंती केली होती. परंतु मला बोलू दिले नाही. आपण चुकीचे करत आहात. (सभागृहात गोंधळ).

मा.श्री.गणेश कवडे :- मा.श्री.अभिषेक कळमकर, मा.श्री.सुनिल कोतकर, मा.श्री.संजय घुले, मा.श्री.स्वप्निल शिंदे ,मा.श्री.संपत बारस्कर गोंधळ घालू नका कामकाजाची कागदपत्रे फाडू नका. महिला महापौर आहेत. अरवाच्य भाषेत बोलू नका. तुम्हांला सभागृह चालू दयायचे की नाही हे तरी एकदा सांगा.

मा.श्री.मनोज दुलम :- मा.महापौर साहेब सभागृहासमोर बराच वेळ चर्चा चालू आहे तथापी विरोधी पक्षाचे नगर सेवक गडबड गोधंळ करून चर्चा होवू देत नाही. मा.सभागृहात या पूर्वी शहर विकास आघाडीचे २२ सदस्य होते. तदनंतर काळात काही नगरसेवक मयत झाले व काही अपात्र ठरल्यामुळे संबंधीत वॉर्डामध्ये रितसर पोट निवडणूक झालेली आहे. सदर निवडणूकीमध्ये वेगवेगळया पक्षाचे उमेदवार निवडूण आलेले आहे. सद्यपरिस्थितीत नगर शहर विकास आघाडीचे फक्त १९ सदस्य आहेत. त्यामुळे तौलानिक संख्याबळाचा विचार करता पक्षनिहाय नामनिर्देशीत करावयाची सदस्य संख्या योग्य आहे. तसेच मा.सभागृहासमोर संबंधीत पक्षाचे अधिकृत गट नेते जे आहेत त्यांनी नामनिर्देशन केल्याप्रमाणे नामनिर्देशन करणे योग्य होईल असे चर्चेत सांगितले व बंद पाकिटात अधिकृत मा.गटनेत्यांनी नामनिर्देशन केल्या प्रमाणे सदस्यांची नामनिर्देशन करणे योग्य होईल.

मा.श्री.संजय शेंडगे :- महापौर साहेब, सभागृहात झालेल्या चर्चे प्रमाणे तीन सदस्यांना मा.महासभेतून नामनिर्देशन करण्यात यावे असे सुचवले.

मा.श्री.संजयकुमार लोंढे :- भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आघाडीचे अधिकृत गटनेते मा.श्री.संदिप भानुदास कोतकर यांच्याकडून कोणतेही पत्र प्राप्त न झाल्याने संबंधीत पक्षाच्या सदस्यांचे नामनिर्देशन महासभेतून करण्यात यावी असे सुचविण्यात आले.

सबब प्रशासकीय प्रस्तावानुसार शहर विकास आघाडीचे अधिकृत गट नेते मा.श्री.खान समद वहाब यांनी नामनिर्देशीत केलेले सदस्य १) मा.श्री.बाळासाहेब उर्फ चंद्रशेखर मारूती बोराटे २)मा.श्रीमती कलावती सुर्यभान शेळके ३) मा.सौ.सुनिता किसन भिंगारदिवे यांची नांवे नामनिर्देशीत केली. शिवसेना व अपक्ष विकास आघाडीचे अधिकृत गट नेते मा.श्री.संजय शेंडगे यांनी मा.श्री.सचिन तुकाराम जाधव यांचे नावाने नामनिर्देशन केले. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आघाडीचे अधिकृत गटनेते मा.श्री.संदिप भानुदास कोतकर यांच्याकडून कोणतेही पत्र प्राप्त न झाल्याने महासभेने मा.श्री.मुदस्सर जहॉंगिर शेख यांचे नांव महासभेतून नामनिर्देशीत करण्यात आले. तसेच मा.विरोधी पक्ष नेते मा.श्री.संजय शेंडगे यांनी पुढील प्रमाणे तीन सदस्यांची नांवे महासभेतून नामनिर्देशीत केलेली १) मा.श्री.दिलीप नानाभाउ सातपुते २) मा.श्री.मनोज लक्ष्मण दुलम ३) मा.सौ.सुनिता भगवान फुलसौंदर यांची नांवे नामनिर्देशीत करण्यात यावी. यांस नगरसेवक मा.श्री. अनिल शिंदे यांनी अनुमोदन दिले.

---*---

**ठराव :-**

ठरविण्यांत येते की, पक्षीय बलाबला प्रमाणे व तौलनिक संख्याबळ व संबंधीत पक्षाचे नोंदणीकृत व अधिकृत मा.गटनेत्यांनी नामनिर्देशनाव्दारे सुचविलेल्या प्रमाणे तसेच मा.महासभेस प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार व महासभेत झालेल्या चर्चेनुसार व मा.सदस्यांच्या मा.महासभेतील सुचनेनुसार पुढील ८ सदस्यांची मा.स्थायी समितीच्या सदस्यपदी मा.महासभेने मान्यता दिल्याचे विधीग्राहयरित्या नामनिर्देशनाव्दारे नेमणुक झाल्याचे मी घोषित करीत आहे.

| **अ.नं.** | **सदस्यांचे नांव** | **पक्ष** |
|---|---|---|
| १ | मा.श्री.बाळासाहेब चंद्रशेखर मारुती बोराटे | शहर विकास आघाडी |
| २ | मा.श्रीमती.कलावती सुर्यभान शेळके | शहर विकास आघाडी |
| ३ | मा.सौ.सुनिता किसन भिंगारदिवे | शहर विकास आघाडी |
| ४ | मा.श्री.सचिन तुकाराम जाधव | शिवसेना व अपक्ष विकास आघाडी |
| ५ | मा.श्री.मुदस्सर जहॉंगिर शेख | महासभेमधुन(भारतीयराष्ट्रीय कॉंग्रेस आघाडीच्या गटनेत्याचे पत्र नसल्याने) |
| ६ | मा.श्री.दिलीप नानाभाउ सातपुते | महासभेमधुन |
| ७ | मा.श्री.मनोज लक्ष्मण दुलम | महासभेमधुन |
| ८ | मा.सौ.सुनिता भगवान फुलसौंदर | महासभेमधुन |

सुचक : मा.श्री. संजय छगनराव शेंडगे

अनुमोदक : मा.श्री. अनिल माधवराव शिंदे

ठराव बहुमताने मंजूर.

महापौर तथा पिठासीन अधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका.